## *एफ. वाय. बी. ए. (सेमिस्टर – १ )*
## *विषय : मराठी साहित्य : कथा आणि भाषिक कौशल्यविकास*

*प्रा. डॉ. दत्तात्रय बाळासाहेब वेलजाळी*
*एम.ए.नेट, सेट, पीएच. डी.*
*(मराठी विभागप्रमुख, सिन्नर महाविद्यालय)*

### घटक - ३) भाषिक कौशल्यविकास

### अर्जित कौशल्य - १. संभाषण कौशल्य :

भाषा हे संभाषणाचे महत्वाचे साधन आहे. स्वतःचे विचार, मत, भावना व्यक्त करण्यासाठी संवाद साधण्याची गरज असते. भाषण एका व्यक्तीचे असते. संभाषण हा शब्द मात्र दोन किंवा अधिक व्यक्तींमधील बोलण्यासाठी वापरला जातो. शब्दांची देवघेव संभाषणातून होते. जीवनात फारच थोड्या बाबी आपण एकट्याने करतो. अनेक बाबतीत आपण एकमेंकावर अवलंबून असतो. आपण शब्दांनी, चिन्हांनी किंवा हावभावांनी एकमेकांशी संवाद साधत असतो. आपण संवाद साधल्याने शारीरिक दृष्टीने दुस-या व्यक्तीपासून कितीही दूर असलो तरी मनाने जवळ पोहोचतो. संभाषण कौशल्य अवगत असेल तर आपले हेतू साध्य होण्यास मदत होते.

### संभाषण किंवा संवाद व्याख्या –

- दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र आल्या की, आपसात जे बोलतात त्याला 'संवाद' किंवा 'संभाषण' असे म्हणतात.
- आपल्या मनातील भावभावना आणि विचारांचे भाषेच्या किंवा हावभावांच्या माध्यमातून इतरांसमोर केले जाणारे प्रकटीकरण म्हणजे 'संभाषण' किंवा 'संवाद' होय.
- एखाद्या निश्चित विषयावर जे संभाषण चालते त्याला 'संवाद' असे म्हणतात.

## संभाषण कौशल्याचे स्वरूप :

दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र आल्या की त्यांच्यामध्ये जे बोलणे किंवा भाषण होते त्याला संभाषण असे म्हणतात. दोन माणसे सहज भेटली म्हणजे ती एकमेकांशी बोलतात. त्यांच्या बोलण्याच्या विशिष्ट असा विषय नसतो. एकमेंकाचे कुशल विचारण्यापासून तो हवी असलेली माहिती विचारीपर्यंतचे विविध विषय त्यात येऊन जातात. पण एखाद्या निश्चित विषयावर जे संभाषण चालते त्याला संवाद असे म्हणतात. संवाद लेखनात संभाषणाचे सारे गुणविशेष आढळून येतात.

एकाने दुस-याला काही सांगणे, ज्याला ते सांगायचं आहे त्याच्यापर्यंत ते जे आणि जसं पोहोचवायचं असेल तसं पोहोचवणे आणि ऐकणा-याला जे समजलं आहे, त्याबद्दलचा प्रतिसाद त्याच्याकडून सांगणा-यापर्यंत येऊन पोहोचणे ही प्रक्रिया पूर्ण होते तेव्हा संवादाची प्रक्रिया पूर्ण होते असे म्हणतात.

संवाद प्रक्रियेशी दोन घटक संबंधित आहेत - १. ऐकणारा, २. बोलणारा

बोलणा-याच्या मनातील भाव-भावना, विचार ऐकणा-याला समजले म्हणजे संवाद प्रक्रिया पूर्ण होते. त्यासाठी हे दोन्ही घटक समान भाषिक असणे आवश्यक आहे. शिवाय दोघांची मानसिकता संवादास पूरक असली पाहिजे तरच संवाद प्रक्रिया पूर्ण होते.

थोडक्यात बोलणा-याच्या मनातील भाव-भावना, विचारांचे श्रवण केल्यावर ऐकणा-याने त्या विचारांचे ग्रहण करणे म्हणजे भाषिक संदेशन पूर्ण होणे होय. यालाच भाषिक संवादाची प्रक्रिया असे म्हणतात.

## संभाषणात भाषेचे महत्त्व :

भाषा हे विचार विनिमयाचे श्रेष्ठ साधन आहे. भाषेमुळे देवाण-घेवाण सोपी होते. भाषेमुळे समाज व्यवहार चालतो, म्हणून भाषा एक सामाजिक संस्था आहे. भाषा नसती तर आपले व्यवहार सुरळीत पार पडले नसते. संभाषणात भाषेला महत्त्व आहे. शब्द, भाषा यांनी आपले व्यवहार सोपे केले आहेत. आपण अनेक भाषा, पोट भाषा वापरतो. त्या प्रत्येक भाषेचा बाज वेगळा व बोलण्याची पद्धतही वेगळी असते. हे सर्व आपण संवादासाठी करत असतो.

मानवाला ईश्वराने भाषेची देणगी दिलेली आहे. भाषेच्या जोरावर माणसाने अलौकिक अशी प्रगती केलेली आहे. भाषेतून, बोलण्यातून माणूस स्वत:ला व्यक्त करत असतो. संभाषण शक्य होण्यासाठी वक्ता व श्रोता यांना एक सामाईक भाषा अवगत असणे ही महत्त्वाची बाब आहे. कमीतकमी दोन तरी व्यक्तींना एकत्र आणणे हाच मुळी भाषेचा मुलभूत हेतू आहे.

## संभाषण कौशल्याचे प्रकार :

संभाषणाचे एकूण चार प्रकार सांगता येतील.

### १ प्रत्यक्ष संभाषण –

दोन व्यक्तींनी समोरासमोर केलेले संभाषण म्हणजे प्रत्यक्ष संभाषण होय. यामध्ये शिक्षक- विद्यार्थी, डॉक्टर-रुग्ण, वकील-अशील, विक्रेता-ग्राहक या स्वरुपाचे संभाषण प्रत्यक्ष संभाषणात येते.

### २ अप्रत्यक्ष संभाषण –

अप्रत्यक्ष संभाषणात दोन व्यक्ती समोरासमोर संभाषण करत नाहीत तर फोन, मोबाईल, रेडिओ, दूरचित्रवाणी, पत्र, ई-मेल, सीडी, कॅसेट यांसारख्या माध्यमांतून एकमेकांशी संवाद साधतात.

### ३ औपचारिक संभाषण –

व्यवसाय, व्यवहार या प्रसंगी समोरच्या व्यक्तीशी आपणाला औपचारिकपणे संभाषण करावे लागते. व्यवसायात एखाद्या व्यक्तीशी नव्याने ओळख होते, त्या व्यक्तीशी औपचारिक संभाषण केले जाते. तसेच चर्चासत्र, सभा याप्रसंगी वक्ते परस्परांशी संभाषण करतात, ते औपचारिक स्वरुपाचे असते. बॅंका, विमा, मार्केटींग या ठिकाणी औपचारिक संभाषण बघावयास मिळते.

### ४ अनौपचारिक संभाषण –

आई-मुलगी, प्रियकर-प्रेयसी, मित्र-मैत्रीण, पती-पत्नी या नात्यांमध्ये वेगवेगळ्या विषयांवर मनमोकळ्या गप्पा होत असतात. या संभाषणात एकमेकांचे म्हणणे ऐकून घेतले जाते. आपल्यावरील अन्याय, अपेक्षा, इच्छापूर्ती बोलून दाखविल्या जातात याला अनौपचारिक संभाषण म्हणतात.

## संभाषण कौशल्यातील अडथळे/ अडचणी :

संभाषण कौशल्यामध्ये आत्मविश्वासाला महत्त्व आहे. श्री मंगेश देशमुख यांनी आपल्या ग्रंथात संभाषण कौशल्यातील अडचणी सांगितल्या आहेत.

- संभाषण कौशल्यामध्ये धर्मबंधन, दुस-या राजकीय पक्षाचा असणे यामुळे मतभेद होऊ शकतात, त्यामुळे संभाषणात अडथळा निर्माण होतो.
- समोरची व्यक्ती दुस-या गावातील, प्रांतातील असेल तर तिच्याविषयी आपल्या मनात पूर्वग्रहदूषितपणा असू शकतो त्यामुळेही संभाषणात अडचण निर्माण होते.
- दुस-याकडून फसविले जाण्याची भिती असेल तर संभाषण व्यवस्थित होत नाही.
- मानसिक व शारीरिक आरोग्य व्यवस्थित नसेल तर संभाषम योग्य प्रकारे व योग्य दिशेने होऊ शकत नाही.
- अस्वच्छतेमुळे अनेकांचे मानसिक आरोग्य बिघडते. त्याचाही प्रतिकूल परिणाम संभाषणावर होतो.
- एकाग्रता कमी असेल तर नेमक्या विषयावर संवाद साधतांना अडचणी येतात.
- स्वतःला इतरांपेक्षा कमी लेखणे म्हणजेच न्यूनगंडाची भावना मनात निर्माण झालेली असेल तर त्याचाही विपरित परिणाम संभाषणावर होतो.
- बोलणा-याचा आवाज आवाज बारीक असणे हे देखील संभाषण कौशल्यावर परिणाम करते.

## संभाषण कौशल्य सुधारण्याचे उपाय -

- ✓ संभाषण कौशल्य सुधारण्यासाठी अपले भाषेवर प्रभुत्व हवे.
- ✓ वादविवाद टाळले तर मित्र वाढतात.
- ✓ दुस-यांच्या मताबद्दल आदर दाखवावा, त्यांच्या मताशी सहमत नसल्यास सौम्यपणे तसे सांगावे.
- ✓ आपली चूक झाली असेल तर तत्काळ मान्य करावे.
- ✓ स्वत: आपण कमी बोलावे दुस-यांना जास्त बोलण्याची संधी द्यावी.
- ✓ समोरच्याच्या बोलण्याला उत्तम प्रतिसाद द्यावा.
- ✓ आपण संवाद साधतो. तेव्हा समोरच्याच्या नजरेला नजर भिडविल्यास आपला आत्मविश्वास वाढतो.
- ✓ आपण जो पोशाख परिधान करतो तो स्वच्छ, नीटनेटका व रंगसंगतीनुसार असावा.
- ✓ कोणतीही गोष्ट करताना दुस-याच्या नजरेतून पाहावे.
- ✓ इतरांचे चांगले गुण बघण्याची सवय लावावी.
- ✓ समोरच्या व्यक्तीला त्याच्या चुका दाखविताना आधी त्यांच्या गुणांचे कौतुक करावे व नंतर सौम्य शब्दांत त्यांच्या चुका दाखवून द्याव्यात.